CNR No. MHPU13-000962-2010

**<u>नि.दि.मु.नं. २१३/२०१०</u>**

## <u>निशाणी २४० लगत आदेश</u>

(**श्रीमती प्रभावती मुरलीधर जगताप वि. श्री. अंकुश बाबासो जगताप वगैरे**)

प्रस्तुतचा अर्ज वादीतर्फे कागदपत्र दाखल करण्यास परवानगी मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

२. वादीच्या कथनानुसार, प्रस्तुत दाव्याचे कामी आवश्यक व महत्वाची कागदपत्रे पुराव्याच्या कामी दाखल करण्याची परवानगी मिळावी अशी विनंती केली.

३. सदरच्या अर्जावर प्रतिवादीतर्फे म्हणणे दिले की, प्रस्तुत दावा वादीचे तोंडी पुराव्यासाठी नेमलेला आहे. दाव्याचे कामी कागदपत्र दाखल करण्याची स्टेज नाही. वादीला कागदपत्र दाखल करण्यास काहीही वाजवी कारण नसलेने अर्जामध्ये कारण नमूद केलेले नाही. सदर कागदपत्र दावा मिळकतीबाबतचे नाहीत. गैरलागू कागदपत्र दाव्याचे कामी दाखल करण्याची तरतूद नाही. अर्ज मोघम स्वरुपाचा आहे. त्यामुळे मान्य व कबूल नाही. दाव्याचे कामकाज लांबणीवर पडावे अशा हेतूने अर्ज दिला असल्याने अर्ज नामंजूर करावा अशी विनंती केली.

४. दोन्ही पक्षकारांतर्फे युक्तिवाद ऐकला. प्रस्तुतचा दावा वाटप, स्वतंत्र कब्जा व निरंतर ताकिदीसाठी दाखल केला आहे. तसेच दावा वादीचे उलट तपासासाठी प्रलंबीत आहे. यावरुन कागदपत्र दाखल करण्याची स्टेज निघून गेली असल्याचे दिसून येते. वादीने प्रस्तुत अर्ज दाखल करण्यास विलंब का झाल याचे

कारण नमूद केलेले नाही. परंतु दाव्यातील वादी, प्रतिवादींचे कथन पाहता व दाव्याचा विषय विचारात घेता, दोन्ही पक्षकारांना पुरावा मांडण्याची संधी देणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक आहे. दाव्याचा विषय गुणदोषावर निर्गत करणेसाठी अर्ज मंजूर केल्याने मदतच होणार आहे. याउलट, अर्ज नामंजूर केल्याने प्रक्रियात्मक विलंब वाढणार आहे. अर्ज मंजूर केल्याने प्रतिवादीचे नुकसान होणार नाही. प्रतिवादीस सदर कागदपत्रांवर वादीचा उलटतपास घेण्याची संधी मिळणार आहे. वादीने केलेल्या विलंबाचा खर्च वादीवर ठेवणे न्याय्य व योग्य आहे. वरील सर्व कारणांचा विचार करता खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

**<u>आ दे श</u>**

१. अर्ज (नि.क्र.२४०) हा वादीने प्रतिवादीस पुढिल तारखेपर्यंत विलंबाचा खर्च रक्कम रुपये २००/- एवढा देण्याच्या अटिवर मंजूर करणेत येतो.

२. वादी यांना अर्जामध्ये नमुद केल्याप्रमाणे कागदपत्रे दाखल करण्यास परवानगी देणेत येते.

SEEMA KETAN DESHMUKH
Digitally signed by SEEMA KETAN DESHMUKH
Date: 2024.12.07 16:48:25 +0530

सासवड.
दिनांक – ०७/१२/२०२४

**(सौ. एस. के. देशमुख)**
सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, सासवड.

**C E R T I F I C A T E**

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment / Order.

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of Stenographer | : | Mr. P. V. Satpute |
| (b) | Court | : | Mrs. S. K. Deshmukh, Civil Judge, J.D. & J.M.F.C.,Saswad |
| (c) | Date of Judgment /Order | : | 07/12/2024 |
| (d) | Judgment /Order signed by P.O. on | : | 07/12/2024 |
| (e) | Judgment /Order uploaded on | : | 07/12/2024 |